

नमस्कार! मी महेश, पालिकेमध्ये FSTP ऑपरेटर म्हणून काम करतो. मला माहिती आहे की, आपल्यापैकी अनेकजण कोविड 19 महामारीच्या काळात नागरिकांची सेवा करीत आहेत आणि म्हणूनच करोना व्हायरसपासून तुमचे संरक्षण होण्यासाठी आवश्यक संरक्षक सूचना मी आपल्याला सांगू इच्छितो.

**विशेष नोंध :** या सूचना नियमित कार्यपद्धतीचा भाग नसून केवळ सफाई कामगारांनी कोविड 19 महामारीच्या काळात सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती अतिरिक्त काळजी घ्यावी याकडे लक्ष वेधण्यासाठी आहेत.

## आपल्या घरातून कामावर जाण्यापूर्वी या गोष्टी आवर्जून करा-

1. आपले शरीर पूर्ण झाकले जाईल असे कपडे वापरा
2. जर आपल्याला जखम झाली असेल तर त्यावर जलरोधक पट्टी लावा
3. हात धुण्यासाठी साबण आणि पाणी तुमच्याबरोबर ठेवा
4. पालिके ने दिलेला अत्यावश्यक सेवकाचा पास आपल्याजवळ ठेवा
5. वाहनातून सहप्रवास करीत असाल तर सुरक्षित अंतर ठेवून विरुद्ध बाजूस बसा (4 FT)
6. कपड्यांची जास्तीची जोडी आपल्या बरोबर राहु द्या

## कामावर गेल्यावर या गोष्टी नक्की कराच-

1. हात साबणाने किमान 20 सेकंद धुवा
2. अनावश्यक वस्तूना स्पर्श करणे टाळा
3. हातमोजे, मास्क, एप्रेन, बूट या वैयक्तिक सुरक्षा साधनांचा (PPE) वापर करा
4. चेहरा, नाक, डोळे यांना स्पर्श करू नका
5. कामाचा भाग म्हणून प्रवास करताना सहकाऱ्यापासून सुरक्षित अंतर ठेवा (1m)

## काम करताना या गोष्टी लक्षात ठेवा-

1. सहकाऱ्यासोबत बसू नका, सुरक्षित अंतर ठेवा (4 FT)
2. वारंवार हाताळल्या जाणाऱ्या गोष्टी जसे पाण्याचे नळ, जिन्याचे कठडे, दरवाज्यांच्या मुठी ईत्यादि यांचे दर 2 ते 4 तासात निर्जंतुकीकरण करणे आवश्यक आहे
3. मळ, गाळ यांचे नमुने काळजीपूर्वक घ्यावेत
4. ते घेत असता चेहरा, नाक, डोळ्यास स्पर्श झाल्यास तो स्वच्छ करावा
5. द्रव स्वरूपातील घाण चुना पावडर वापरून निर्जंतुक करावी (Lime powder)
6. जेवणाआधी व नंतर हात साबणाने स्वच्छ धुवावेत (तसेच द्रव स्वरूपातील मळ हाताळणी केल्यावर, रजिस्टरला हात लावल्यावर, साफसफाई करून झाल्यावर हात स्वच्छ धुवावेत)
7. अनावश्यक गोष्टींना हात लावू नका

## दिवस अखेरीस-

- सुरक्षा साधने काढा.
- चेहरा, हात स्वच्छ धुवा
- कपडे बदलून बॅगेत ठेवा
- मास्क घालूनच घरी जा
- घरी गेल्यावर सर्वप्रथम सुरक्षा साधने, वापरलेले कपडे स्वच्छ धुवून कोरड्या जागी वाळत टाका नंतरच कुटुंबियांना भेटा

सर्दी, ताप,खोकल्यासारखी लक्षणे आढळल्यास वैद्यकीय सल्ला घ्या

**करोना व्हायरस वरील लढाईत, आपण सुरक्षित राहून विजय मिळवूयात**

Safety and Dignity to Sanitation Work | Urban Management Centre with support from BMGF | manvita@umcasia.org